प्रेसनोट –

दत्तवाडी पो.स्टे.पुणे
दि. ०५/०८/२०१७

**दत्तवाडी पोलीसांकडुन ३ वाहनचो-यांची उकल. शौकापायी बालअपचारीने केले कृत्य**

दि. ०४/०८/२०१७ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे हजर असताना पो हवा ३०३२ निकम यांना त्यांचे खास बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की रामटेकडी वानवडी येथील दोन लहान मुले त्यांच्याकडे असलेली चोरीची हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर गाडी क्र. एच पी १२ २९८७ ही घेवुन येथे येणार आहे तेव्हा ती बातमी पो हवा ३०३२ निकम यांनी पोलीस उपनिरिक्षक डफळ यांना कळविली असता ती बातमी पोलीस उपनिरिक्षक डफळ यांनी पोलीस निरिक्षक सो(गून्हे) यांना कळविली असता त्यांनी कारवाईबाबत मार्गदर्शन करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणेस सांगीतलेने पोलीस उपनिरिक्षक डफळ व स्टाफ असे तत्काळ कै.शंकरराव तावरे उद्यान येथे ०९/३० वा. गेले असता त्यांना त्याठिकाणी दोन मुले वरील वर्णनाची व नंबरची गाडी घेवुन अक्षरबागसमोर थांबलेले दिसले तेव्हा पोलीसांची खात्री होताच त्यांना ताब्यात घेवुन त्याचेकडे गाडीचे कागदपत्राबाबत चौकशी केली असता ती गाडी चोरीची असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दत्तवाडी पोलीस ठाणे येथे आणुन विश्वासात घेवुन त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्याने आणखी २ गाडया चोरल्या असल्याचे सांगीतल्याने त्याप्रमाणे तपास केला असता नमुद बालअपचारी याने दत्तवाडी, विश्रामबाग या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एकुन ०३ मोटारसायकल चोरल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

वरील तपास हा मा.डॉ. प्रविण मूंडे सो पोलीस उपायुक्त परि. २ पुणे शहर, मा. डॉ. शिवाजी पवार सो सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे शहर, दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरिक्षक श्री अनिल पाटील सो, व पो. नि. गुन्हे कृष्णा इंदलकर, सो‍ा यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप-निरीक्षक श्री अनिल डफळ व पोलीस कर्मचारी पो.हवा. तानाजी निकम, पो.ना. महेश गाढवे, पो.शि. अमित बोडरे, पो शि रोहन खैरे, पो शि सागर सूतकर, पो शि शरद राऊत, पो शि विकास कदम,पो शि अमर लोणकर. यांनी केला.